MHAU07001572025

नियमीत दिवाणी दावा क्र. २९७/२०२५

**रामभाभी भाऊसाहेब सुकासे Vs. प्रकाश भानुदास निकम व इतर**

नि.क्र.४८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज 'लेखी जबाब नाही' हा प्रतिवादी यांच्या विरुध्द झालेला आदेश बाजूस सारुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२ प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने पक्षकार समाविष्ठ करण्यासाठी अर्ज दिला होता. त्यात त्यांच्या विरुध्द विना लेखी जबाब आदेश पारित झाला होता. मात्र योग्य ती परिस्थिती पटलावर येण्याकरीता लेखी जबाब पटलावर येणे आवश्यक आहे. सबब त्यांच्या विरुध्द दि. १८.०९.२०२५ रोजी पारित झालेला विना लेखी जबाब आदेश बाजुस सारुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादीने नि.क्र.१४ अन्वये सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ चा अर्ज २०००/- रुपये कॉस्टवर मंजुर करण्यात हरकत नसल्याचे वादीने म्हणटले आहे.

४. सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल केले आहे. वादीचे असे कथन आहे की, अर्जात नमुद केलेले कारण योग्य नाही. सबब अर्ज ना मंजुर करावा अशी विनंती वादीच्या विधीज्ञांनी केली.

५. प्रस्तुत प्रकरणाच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दिनांक १८/०९/२०२५ रोजी प्रतिवादीं विरुध्द दुरुस्त अर्जावर, पक्षकार समाविष्ठ करण्याच्या अर्जावर म्हणणे दिले नाही म्हणुन 'लेखी जबाब नाही' असा आदेश पारित करण्यात आला. प्रस्तुतचा अर्ज त्वरीत त्याच दिवशी म्हणजेच दि. १८.०९.२०२५ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच सदर अर्ज हा आदेश परित झाल्यापासुन त्वरीत दाखल केला आहे. अर्जात नमूद कारणांच्या पुष्ठयर्थ कोणताही पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. मात्र प्रतिवादीचे म्हणणे विचारात घेतल्या शिवाय अर्जाचा निर्णय गुणावगुणावर होणार नाही. सबब प्रतिवादीला संधी म्हणून त्याचे विरुध्द झालेला ''लेखी जबाब नाही'' हा आदेश बाजूस सारणे योग्य होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीं विरुध्द पारित झालेला नि.क्र. ९ वरील विना लेखी जबाब आदेश बाजुस सारण्यात येतो.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.09.22 15:05:50 +0000

दि. १८/०९/२०२५

(आर.एन. पाठक )
सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर),
गंगापुर

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba Age<br>Stenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 18/09/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 18/09/2025 |
| Judgment uploaded on | : 22/09/2025 |